**ठळक बातम्या**

- शरद पवार आणि काँग्रेस ठरवतील त्या मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याची उद्धव ठाकरे यांची घोषणा, निकालानंतर मुख्यमंत्रीपदाविषयी चर्चा करण्याची काँग्रेसची भूमिका
- बांग्लादेशमध्ये होत असलेल्या अत्याचारांच्या विरोधात पुकारलेल्या बंदला राज्यात काही ठिकाणी हिंसक वळण, नाशिकमध्ये २ पोलीस जखमी
- अमेरिकेतलं मंदीचं सावट दूर झाल्यानं देशातल्या शेअर बाजारात मोठी तेजी

**आणि**

- ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारात वाळवी ठरला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी शरद पवार आणि काँग्रेसच्या नेत्यांनी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करावा, त्याला पाठिंबा देण्याची घोषणा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. ते आज मुंबईत महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बोलत होते. निवडणुकीला सामोरं जाण्यासाठी महाविकास आघाडी तयार असून ही महाराष्ट्राचा स्वाभिमान जपण्याची लढाई असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले. आरक्षणाची ५० टक्क्याची

मर्यादा वाढवण्यासाठी विधेयक आणलं तर महाविकास आघाडीचे पक्ष त्याला पाठिंबा देतील, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी हाच चेहरा असेल, निकालानंतर एकत्रित बसून मुख्यमंत्री ठरवू, असं पुनर्प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावेळी केलं.

लोकसभेत यश आलं म्हणजे राज्यघटनेवरचं संकट टळलं, असं नाही, असा इशारा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी या मेळाव्यात दिला. ज्यांच्या हातात देशाची सूत्र आहेत त्यांना संवैधानिक संस्था, विचारधारा आणि तरतूदी यांच्याबाबत आस्था नाही, असा आरोप त्यांनी केला.

हे बेकायदा सरकार जनतेला उलथवून लावायचं आहे, असं आवाहन काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांनी केलं.

सर्वांना कामाला लागता यावं यादृष्टीनं राज्यात जागावाटपाची घोषणा लवकरात लवकर करावी, असं मत खासदार सुप्रिया सुळे यांनी मांडलं.

मविआची सत्ता आल्यानंतर मुंबई महानगरपालिकेच्या दोन वर्षांच्या कारभाराची श्वेतपत्रिका काढू, असं मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या.

**<><><><><>**

नारायण राणे यांची खासदारकी रद्द करण्यासंबंधी ठाकरे गटाचे माजी खासदार विनायक राऊत यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर १२ सप्टेंबर पर्यंत उत्तर द्यायचे निर्देश उच्च न्यायालयानं राणे यांना दिले आहेत. राणे यांनी अवैध मार्गांनी ही निवडणूक जिंकली असल्याची याचिका राऊत यांनी उच्च न्यायालयात केली होती. त्यावर आज न्यायलयानं राणे यांना हे निर्देश दिले आहेत.

**<><><><><>**

राज्यातील महिला बचतगट आणि महिला उद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनांना राष्ट्रीयस्तरावर बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी आर्टीफिशिअल इंटेलिजन्स आधारीत डिजीटल मार्केटींग ॲप तयार करावं. शहरांमध्ये बचतगटांची संख्या वाढवावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**<><><><><>**

बांगलादेशमध्ये होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात राज्यात काही धार्मिक संघटनांनी बंद पुकारला होता. त्याला काही ठिकाणी हिंसक वळण लागलं.

**नाशिक**मध्ये काही दुकानदारांनी बंदला विरोध केल्यानंतर दुकान बंद करण्यावरुन दोन गटात वाद झाला. यावेळी आंदोलकांनी काही दुकानांची तोडफोड केली. यावेळी झालेल्या दगडफेकीत दोन पोलिसांसह काही जण

जखमी झाले. पोलिसांनी अश्रुधूराचा वापर करुन परिस्थिती नियंत्रणात आणली. सध्या नाशिक शहरात तणावपूर्ण शांतता असून संवेदनशील भागात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**जळगाव**मध्येही निषेध मोर्चा दरम्यान काही आंदोलकांनी एका दुकानाची तोडफोड केली. त्यानंतर पोलीसांनी सौम्य लाठीमार केला.

**नंदुरबार** शहरासह, शहादा, धडगावमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला.

**<><><><><>**

कोलकात्यात महिला डॉक्टरवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. याच्या निषेधार्थ आज धुळे इथल्या हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवासी डॉक्टरांनी संप पुकारत ठिय्या आंदोलन केलं. त्यामुळे रूग्णालयातल्या अनेक सेवांवर परिणाम दिसून आला.

दरम्यान कोलकात्यात झालेल्या प्रकाराच्या निषेधात ऑल इंडिया मेडीकल असोसिएशने उद्या देशव्यापी बंदची हाक दिली आहे. त्यात सहभागी होण्याचा निर्णय सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या डॉक्टरांनी घेतला आहे. या बंद मधून अत्यावश्यक सेवा वगळण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

गुप्तवार्ता महसूल संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी गुप्त सुत्रांनी दिलेल्या माहितीच्या आधारे आज मुंबई विमानतळावर नैरोबीहून आलेल्या एका महिलेला अटक केली. तपासणी केल्यानंतर या महिलेकडून शँपूच्या बाटल्यांमध्ये भरलेलं जवळपास दोन किलो कोकेन जप्त केलं. या कोकेनची किंमत जवळपास २० कोटी असल्याचं सांगितलं जातंय. या महिलेवर अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

नक्षल्यांची सहकारी असलेल्या आणि गेल्यावर्षी आत्मसमर्पण केलेल्या रजनी ऊर्फ कलावती समय्या वेलादी या महिलेनं आज गडचिरोली पोलीसांच्या मदतीनं विवाह केला. अहेरी तालुक्यातल्या कैलास मडावी या युवकाशी तिचा विवाह झाला.

**<><><><><>**

गेल्या काही दिवसांपासून घसरत असलेल्या देशातल्या शेअर बाजारांनी आज मोठी तेजी नोंदवली. सेन्सेक्स १ हजार ३३१ अंकांची वाढ नोंदवून ८० हजार ४३७ अंकांवर बंद झाला. निफ्टीही ३९७ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ५४१ अंकांवर बंद झाला. अमेरिकी अर्थव्यवस्थेच्या ताज्या आकडेवारीनुसार मंदीचं सावट दूर झाल्यानं ही तेजी दिसून आली. वाहन, माहिती तंत्रज्ञान, बँकींग क्षेत्रातले समभाग आज वधारले.

**<><><><><>**

७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार ‘वाळवी’ या चित्रपटाला जाहीर झाला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आज या पुरस्कारांची घोषणा केली. नॉन फीचर विभागात सोहिल वैद्य दिग्दर्शित ‘आदीगुंजन’ या मराठी माहितीपटानं सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा मान मिळवला. याच माहितीपटासाठी सुमंत शिंदे यांना सर्वोत्कृष्ट निवेदनासाठी पुरस्कार जाहीर झाला.

सर्वोत्कृष्ट कला/संस्कृतीविषयक चित्रपटाचा मान सचिन सूर्यवंशी यांच्या ‘वारसा’ या मराठी चित्रपटानं पटकावला. तर अशोक राणे दिग्दर्शित ‘आणखी एक मोहेंजोदारो’ हा सर्वोत्कृष्ट चरित्र अथवा ऐतिहासिक चित्रपट ठरला.

‘आट्टम’ या मल्याळम चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार जाहीर झाला. ‘ऊँचाई’ या चित्रपटासाठी सूरज बडजात्या यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार जाहीर झाला. ‘तिरुचित्रमबलम’ या चित्रपटासाठी नित्या मेनन आणि ‘कच्छ एक्सप्रेस’ या चित्रपटासाठी मानसी पारेख सर्वोत्कृष्ट नायिका ठरल्या. ‘कांतारा’ या कन्नड चित्रपटासाठी रिषभ शेट्टी याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जाहीर झाला.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं जम्मू काश्मीर आणि हरयाणा या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम आज जाहीर केला. जम्मू

काश्मीरमध्ये १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर २०२४ अशा तीन टप्प्यात मतदान होईल. जम्मूमध्ये ४३ आणि काश्मीरमध्ये ४७ असे एकूण ९० मतदारसंघ आहेत. काश्मिरी पंडित आणि पीओके मधील विस्थापितांसाठी नायब राज्यपालांकडून एकूण तीन जागांवर उमेदवार दिले जातील. त्यामुळे या राज्यात एकूण ९३ जागांसाठी मतदान होणार आहे.

हरयाणा विधानसभेच्या ९० जागांसाठी १ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. जम्मू-काश्मीर आणि हरयाणा या दोन्ही राज्यांची मतमोजणी ४ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

यापूर्वी हरयाणा आणि महाराष्ट्रातल्या विधानसभेच्या निवडणुका एकत्र घेण्यात आल्या होत्या. मात्र, महाराष्ट्रातली पावसाची स्थिती आणि सणांमुळे महाराष्ट्रातल्या निवडणुका हरयाणासोबत घेत नसल्याची माहिती राजीव कुमार यांनी या वार्ताहर परिषदेत दिली.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं वंचित बहुजन आघाडी आणि प्रहार जनशक्ती पक्षाला निवडणूक चिन्ह दिलं आहे. वंचित चे सर्व उमेदवार गॅस सिलिंडर तर प्रहारचे उमेदवार बॅट या चिन्हावर निवडणूक लढवतील. जातीय सेना पक्षाला कोबी हे चिन्ह निवडणूक आयोगानं दिलंय.

**<><><><><>**

इस्त्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं पृथ्वी निरीक्षण उपग्रह आणि एस आर ओ - डेमो सॅट प्रवासी उपग्रह आज सकाळी श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून यशस्वीरित्या प्रक्षेपित केल्याची माहिती, इस्त्रोचे अध्यक्ष सोमनाथ यांनी दिली. एसएसएलव्हीचं हे तिसरं प्रक्षेपण आहे. याबरोबरंच भारत, सूक्ष्म, लहान आणि नॅनो उपग्रह पाठवायला सक्षम असल्याचं सिद्ध झालं आहे, असंही ते म्हणाले. पाळत ठेवणं, आपत्ती निरीक्षण, आग शोधणं, ज्वालामुखीची, महासागराच्या पृष्ठभागावरील वारे, मातीतील ओलावा, आदी घडामोडींची आगाऊ माहिती या उपग्रहाद्वारे दिली जाईल.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ च्या उद्घाटन समारंभासाठी भारताचे ध्वजवाहक म्हणून भाग्यश्री जाधव आणि सुमित अंतिल यांची निवड करण्यात आली आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात विदर्भात बहुतांश ठिकाणी, कोकणात अनेक ठिकाणी, मराठवाड्यात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**